# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**प्रसिद्धी पत्रक** **ता. ०८ मार्च २०१९**

# सफाई कामगारांना स्थायी नियुक्ती आदेशाचे वितरण

## लाड पागे समिती शिफारशींतर्गत १५७ कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**नागपूर, ता. ८ :** नागपूर महानगरपालिकेमधील १५७ ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांना लाड पागे समितीच्या शिफारशींतर्गत स्थायी नियुक्ती आदेशाचे शुक्रवारी (ता. ८) उपमहापौर दीपराज पार्डीकर, सत्तापक्ष नेते संदीप जोशी, आयुक्त अभिजीत बांगर, आरोग्य समिती सभापती मनोज चापले यांच्या हस्ते वितरण करण्यात आले.

मनपा मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीमध्ये आयोजित कार्यक्रमात लकडगंज झोनचे सभापती दीपक वाडीभस्मे, अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, अतिरिक्त आयुक्त राम जोशी, अतिरिक्त आयुक्त अझीझ शेख, आरोग्य अधिकारी डॉ. सुनील कांबळे, एसबीएम विकास कौंसिलचे अध्यक्ष सतीश सिरसवान, आरोग्य विभागाचे किशोर मोटघरे, राजेश लवारे, विशाल मेहता उपस्थित होते.

१५७ सफाई कर्मचाऱ्यांच्या स्थायी नियुक्ती आदेशासह नागपूर महानगरपालिकेमध्ये काम करताना मृत पावलेले व अपघातामुळे कामावर रूजू न होऊ शकलेल्या ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्तीचे कार्डही यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात तीन ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना कार्ड प्रदान करण्यात आले असून यासंबंधीची उर्वरित प्रक्रिया नियमानुसार लवकरच पूर्ण करण्यात येणार असल्याचे यावेळी आरोग्य विभागातर्फे सांगण्यात आले.

**शहराच्या यशात सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे : उपमहापौर दीपराज पार्डीकर**

आज आपल्या नागपूर शहराचे नाव देशात सन्मानाने घेतले जाते. नागपूर शहर स्वच्छ, सुंदर होत आहे. शहराला अनेक पुरस्कारही मिळाले आहेत. शहराला मिळणाऱ्या या यशामध्ये सफाई कर्मचाऱ्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. आपले शहर स्वच्छ, सुंदर राहावे यासाठी शहरातील घाण साफ करण्याचे मौलिक कार्य हे सफाई कर्मचारी करतात. त्यामुळे शहराच्या प्रत्येक यशामध्ये या सफाई कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे आहे, असे प्रतिपादन उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी यावेळी केले.

ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांच्या संदर्भातील विषय अनेक वर्षापासून प्रलंबित होता. घरातील कर्त्या पुरुषाच्या मृत्यूनंतर कुटुंबाची स्थिती वाईट होते. या विषयावर लक्ष वेधत सत्तापक्ष नेते संदीप जोशी यांनी सभागृहात चर्चा करून ऐवजदारांच्या वारसांना मनपाच्या सेवेत रूजू करण्याबाबत मंजुरी मिळविली. या मंजुरीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुढाकार घेऊन नियुक्तीबाबतचे सर्व मार्ग मोकळे केले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही वेळोवेळी या विषयाकडे विशेष लक्ष देऊन प्रश्न मार्गी लावण्यासाठी नेहमी पाठपुरावा केल्याचे सांगत उपमहापौर दीपराज पार्डीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व सत्तापक्ष नेते संदीप जोशी यांच्या कार्याला मिळालेल्या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

**नियुक्तीच्या यशाचे श्रेय सफाई कर्मचाऱ्यांनाच : संदीप जोशी**

सफाई कर्मचाऱ्यांना स्थायी नियुक्ती देणे व जमादारांच्या वारसांना नियुक्ती कार्ड मिळवून देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्त्वाचे कार्य केले. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही वेळोवेळी या प्रश्नांवर गांभीर्याने चर्चा करून सर्व समस्या मार्गी लावल्या. त्यामुळे आज १५७ कर्मचाऱ्यांना नियुक्तीचे आदेश मिळत आहेत. मात्र या नियुक्तीसंदर्भात मुख्यमंत्री व केंद्रीय मंत्री यांनी पुढाकार घेतला असला तरी यासाठी वेळोवेळी पाठपुरावा करणाऱ्या, समाजातील लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी सतत धडपड करणाऱ्या व शहर स्वच्छ ठेवून नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या सफाई कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे या नियुक्तीच्या यशाचे श्रेय सर्व सफाई कर्मचाऱ्यांचेच आहे, अशा शब्दांत सत्तापक्ष नेते संदीप जोशी यांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव केला.

सुदर्शन, वाल्मिकी, मुखिया यासारख्या समाजाच्या कार्यामुळे आज खऱ्या अर्थाने समाज, शहर व आपल्या देशातील नागरिक मोकळेपणाने श्वास घेऊ शकतात. समाजाच्या सेवेचे महत्त्वाचे कार्य या समाजाकडून होत आहे. या समाजातील मलवाहक जमादारांच्या अनेक वर्षांच्या प्रलंबित प्रश्नांवर न्याय मिळावा यासाठी सभागृहात चर्चा करण्यात आली. माजी महापौर प्रवीण दटके व तत्कालीन सत्तापक्ष नेते दयाशंकर तिवारी यांच्या नेतृत्वात लाड पागे समितीच्या शिफारशींतर्गत नोकरी मिळावी यासाठी प्रयत्न सुरू झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी या समस्यांना गांभीर्याने घेत अनेक वर्ष जे होऊ शकले नाही, ते नियुक्ती संदर्भातील सर्व अडथळे दूर करून कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा केला. या सर्वांमध्ये मलवाहक जमादारांच्या नेत्यांकडूनही वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. त्यामुळे या समस्या तातडीने मार्गी लावता आल्या, असेही सत्तापक्ष नेते संदीप जोशी यांनी यावेळी सांगितले.

सर्व ऐवजदार, सफाई कर्मचाऱ्यांच्या प्रश्नावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्मचाऱ्यांच्या प्रतिनिधीसोबत बैठक आयोजित केली. यामध्ये सर्व ऐवजदारांना मनपामध्ये स्थायी नोकरी देणे व ऐवदारांच्या वारसांना लाड पागे समितीच्या

शिफारशी लागू करून त्यांना नोकरी देण्याच्या विषयावर चर्चा करण्यात आली. यासंबंधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व ऐवजदारांना लाड पागे समितीच्या शिफारशींतर्गत मनपामध्ये स्थायी नोकरी देण्याचा निर्णय दिला, अशी माहिती यावेळी सत्तापक्षनेते संदीप जोशी यांनी दिली. ऐवजदारांच्या अत्यल्प वेतनाबाबत आमदार कृष्णा खोपडे यांनी प्रयत्न करून ऐवजदारांचे वेतन वाढविण्याबाबत महत्त्वाचे कार्य केल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

अनेक वर्षापासून प्रशासनाकडूनही न सुटू शकलेले हे प्रश्न सोडविण्यासाठी आयुक्त अभिजीत बांगर यांनी विशेष पुढाकार घेत सर्व प्रशासकीय अडथळ्यांचा अभ्यास करून सफाई कर्मचाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचे महत्त्वाचे कार्य केले. या कार्यामध्ये अतिरिक्त आयुक्त रवींद्र ठाकरे, राम जोशी, अझीझ शेख यांनीही मौलिक भूमिका निभावल्याबद्दल आयुक्तांसह तिन्ही अतिरिक्त आयुक्तांचेही सत्तापक्ष नेते संदीप जोशी यांनी अभिनंदन केले.

**ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांच्या वारसांना नियुक्तीचे कार्ड प्रदान**

नागपूर महानगरपालिकेमध्ये काम करताना मृत पावलेले व अपघातामुळे कामावर रूजू न होऊ शकलेल्या ऐवजदार सफाई कर्मचाऱ्यांच्या तीन वारसांना नियुक्तीचे कार्ड यावेळी प्रदान करण्यात आले. यामध्ये सौम्य कन्हैया बिरहा, मंजु दर्पण खरे व जितेंद्र भिमराव टेंभरे यांना प्रातिनिधिक स्वरूपात नियुक्तीचे कार्ड देण्यात आले.